# वाल्मिकी रामायण

मंजिरी देशपांडे

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**वाल्मिकी रामायण**
मंजिरी देशपांडे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
मंजिरी देशपांडे
C/o विजय मुसळे
सर्व्हे नं. १३२, रेऊ रेसिडन्सी, दुसरा मजला,
डी विंग, प्लॅट नं. ४,
पेट्रोल पंपाजवळ, वारजे, पुणे- ४११०५८
मो. नं. ९६२३२४६५००

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २५०/-

# वाल्मिकी रामायण

# बालकाण्ड

एकदा नारदांना महर्षी वाल्मिकींनी प्रश्न विचारला, ''देवा! या युगात पृथ्वीवर गुणवान, पराक्रमी, धर्माचे आचरण करणारा, कृतज्ञ, सत्यवादी व दिलेले वचन पाळणारा असा कोण आहे?'' यावर नारदांनी वाल्मिकींना अयोध्येचा राजा श्रीराम याचे जीवन-चरित्र थोडक्यात कथन केले व ते पुढे म्हणाले, ''हे वाल्मिकी, तुझ्या कल्पनेत असलेला, आजच्या युगातील हाच एक गुणवान असा पुरुष आहे.''

रामाची कथा सांगून नारद देवलोकात परत गेले. त्यानंतर तमसा नदीच्या काठी वाल्मिकी स्नानासाठी गेले. आपल्या शिष्यांकडून वस्त्रे घेऊन ते स्नानास तयार झाले. इतक्यात क्रौंच पक्ष्यांचे एक जोडपे मधुर आवाजात बोलत विहार करू लागले. ते त्यांना पाहू लागले. इतक्यात एका पारध्याने त्या जोडीतील नरास बाण मारला. आपल्या पतीची हत्या झालेली पाहून ती पक्षीण घायाळ होऊन दु:खी आवाजात चीत्कार करू लागली.

ते बघून वाल्मिकींना क्रौंच पक्षाची दया आली व तिच्याकडे बघत ते पारध्यास म्हणाले, ''अरे हत्याकारी! तुला तुझ्या संपूर्ण आयुष्यात कधीच सुख-शांती मिळणार नाही कारण मिलनास आतुर झालेल्या एकाची कोणताही अपराध नसताना तू हत्या केलीस.''

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगम: शाश्वती: समा:।
यत् क्रौंचमिथुनादेकमवधी: काममोहितम्।।

अचानक त्यांच्या तोंडून असे वदले गेले, त्यावर त्यांनी विचार केला व आश्चर्याने उद्गारले, ''अरे! हे मी काय बोललो? आपला शिष्य भरद्वाज याच्याशी सल्लामसलत करून त्यांनी याला 'श्लोक' म्हणण्याचे ठरविले.

स्नानानंतर ते आपल्या आश्रमात परत आले. एवढ्यात ब्रह्माजी आश्रमात प्रवेश करते झाले. ते म्हणाले, ''नारदमुनींच्या तोंडून श्रीरामांचे संपूर्ण चरित्रवर्णन तुम्ही ऐकले, त्यांना ओव्यांचे स्वरूप द्या.''

एवढे बोलून ब्रह्माजी अंतर्धान पावले.

## श्रीरामांच्या जीवन-इतिहासाचा शोध

श्रीरामांच्या जीवनवृत्तांताचा सखोल अभ्यास करण्यासाठी वाल्मिकी प्रयत्न करू लागले. त्यांनी राम-लक्ष्मण-सीता, तसेच राज्य, राण्या एवढेच नव्हे तर राजा दशरथाशी संबंधित ज्या-ज्या गोष्टी होत्या जसे की, हसणे, बोलणे, चालणे, राज्यकारभार पाहणे इत्यादी त्यांच्या एकत्रित सवयी व कामाच्या इतर पद्धतींचा पूर्ण शोध घेतला. त्यानंतरच त्यांच्या संपूर्ण चरित्राच्या आधारे महर्षी वाल्मिकींनी काव्य रूपात रामायणाची रचना केली.

उत्तरकाण्डापर्यंत रामायण पूर्ण झाल्यावर त्यांनी आपल्या आश्रमात राहणाऱ्या लव-कुश यांच्याकडून रामायणाचा अभ्यास करून घेतला. लव-कुश आश्रमात मुनी वेशात राहात होते. त्या महाकाव्याचे पठण करून दोन्ही भाऊ ते काव्यरूपात गाऊ लागले. ज्या वेळी दोन्ही भाऊ ऋषी, ब्राह्मण किंवा साधुजनांच्या सहवासात असत त्या वेळी ते रामायणाचे गायन करीत. त्यांच्या गायनाने प्रसन्न होऊन ऋषी-मुनी दोघांना अनेक प्रकारची बक्षीसे देत असत.

एके दिवशी लव-कुश अयोध्येच्या रस्त्यातून रामायण गात चालले होते. त्याच वेळी श्रीरामांची नजर त्यांच्यावर गेली. त्यांनी दोघांना बोलावून घेतले. आपल्या सिंहासनावर आरूढ होत आपले भाऊ व समस्त मंत्र्यांना बोलावून त्यांच्या समक्ष लव-कुश यांना गाण्याची आज्ञा दिली. त्यांनी गायला सुरुवात केली-

## श्रीरामकथा आरंभ

## दशरथाची काळजी

शरयू नदीच्या काठी कोशल नावाचे एक मोठे राज्य आहे. त्याच राज्यात अयोध्या नावाचे एक नगर आहे. धर्मात भेदभाव न करणाऱ्या या राजास अनेक वर्षे पुत्रप्राप्ती होत नव्हती. राजा दशरथास आपली वंशवेल पुढे चालवणारा पुत्र हवा होता. एके दिवशी पुत्र-प्राप्तीसाठी अश्वमेध यज्ञ करावा अशी त्याच्या मनात इच्छा उत्पन्न झाली. सर्व मंत्रिमहोदयांना एकत्रित बोलावून त्यांनी त्यांच्यापुढे आपला हा विचार मांडला.

दशरथ राजाचे मंत्री सुमंत्र यांनी त्यांना असे सुचविले की, काश्यप ऋषींना विभाण्डक नावाचा पुत्र आहे, त्या विभाण्डकाच्या पुत्राचे नाव ऋष्यशृंग असे आहे

जो वनामध्येच मोठा झाला आहे. अंग देशाचा पराक्रमी व बलवान राजा रोमपाद हा पण आपला मित्र आहे. त्याची सुपुत्री शांता व ऋष्यशृंग यांचा विवाह झाला आहे. तेच तुमच्यासाठी पुत्रप्राप्तीसाठी यज्ञ करू शकतील. तुम्ही स्वत: अंगदेशास जाऊन ऋष्यशृंगास सन्मानपूर्वक इकडे आणावे.

दशरथाने वसिष्ठ मुनींना सुमंत्राचे म्हणणे सांगितले व त्यांच्या आज्ञेप्रमाणे ते अंगदेशास निघाले. तिकडे पोहोचल्यावर ऋष्यशृंग रोमपादाजवळच बसलेले त्यांना दृष्टीस पडले. तिथे सात-आठ दिवस दशरथांनी मुक्काम केला. एके दिवशी त्यांनी रोमपादास सांगितले, ''तुमची सुपुत्री शांता व तिचे पती माझ्याबरोबर अयोध्येस येऊ देत. तिकडे एक महत्त्वाचे कार्य आहे.''

रोमपादांनी त्यांच्या विनंतीचा स्वीकार केला व शांतासह तिकडे जाण्यास संमती दिली.

शांता व ऋष्यशृंगासह दशरथ राजा अयोध्येस परत आले. काही काळ लोटल्यावर संधी बघून दशरथांनी ऋष्यशृंगासमोर आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी त्वरित होकार देऊन आज्ञा दिली, ''शरयू नदीच्या उत्तर तीरावर यज्ञभूमी स्थापन करा.''

ऋष्यशृंगाची आज्ञा मिळताच, वेदविद्येत पारंगत असलेल्या ब्राह्मणांना पाचारण केले गेले व शरयू नदीच्या काठी यज्ञभूमीची स्थापना करण्याची आज्ञा दिली. जेव्हा सर्व काम पूर्ण झाले, तेव्हा ऋष्यशृंगासह वसिष्ठ ऋषी यज्ञमंडपात गेले. दशरथाने आपल्या राण्यांसह यज्ञाची दीक्षा घेतली. त्यानंतर शरयू नदीच्या उत्तर काठी यज्ञास आरंभ झाला.

## रावणाच्या जुलुमांची चर्चा

एक वर्षानंतर यज्ञासाठी सोडलेला घोडा भूमंडळाची प्रदक्षिणा करून परत आला. ऋष्यशृंग राजास म्हणाले, ''आता मी आपल्याला पुत्रप्राप्ती होण्यासाठी 'पुत्रेष्टि' यज्ञ करेन.'' असे सांगून त्यांनी यज्ञातील अग्नीस आहुती दिली. त्या वेळी आपापला आहुतीचा भाग ग्रहण करण्यासाठी सर्व देव-देवता, यक्ष, किन्नर, गंधर्व व महर्षिगणांनी यज्ञात आपली उपस्थिती लावली. त्या यज्ञसभेत एकत्र येऊन सर्व देवगण ब्रह्माजींना म्हणाले, ''हे देवा! आपला वर प्राप्त झालेला रावण नावाचा राक्षस आम्हा सर्वांना फार त्रास देत आहे. आपण दिलेल्या वराचा सन्मान राखावा म्हणून आजवर आम्ही त्याचा अन्याय सहन करत आलो. जर कोणी

यशाची पायरी चढत राहिले तर हा दुष्ट राक्षस त्यांचा द्वेष करतो. त्याला देवराज इंद्र यांचा पराभव करण्याची मनोमन इच्छा आहे. तो समस्त ऋषी, यक्ष, गंधर्व, असुर तसेच ब्राह्मणांनाही त्रास देतो व त्यांचा पाणउतारा करतो. त्याच्या या कृत्यामुळे आम्हा सर्वांत भय निर्माण झाले आहे, म्हणून त्याच्या वधासाठी आपल्याला काही ना काही उपाय शोधून काढला पाहिजे.''

देवतांचे सर्व बोलणे ऐकून ब्रह्माजी म्हणाले, ''हे देव-देवतांनो, या दुष्ट राक्षसाच्या वधासाठी मला एक उपाय सुचला आहे. त्याने वर मागताना म्हटले होते, मला गंधर्व, यक्ष, देवता, तसेच राक्षस याच्या हाती मरण येऊ नये. मानवजातीस तो तुच्छ मानत होता, त्यामुळे त्यांच्या हातून मरण न यावे हा वर त्याने मागितला नाही. म्हणून मनुष्याच्या हातूनच आता त्याचा वध होईल.''

ब्रह्माजींचे बोलणे ऐकून समस्त देव-देवता, महर्षी आनंदित झाले. त्या वेळी विष्णुदेव पण तिथे आले. देव-देवतांनी त्यांना सांगितले, ''राक्षसांचा राजा आम्हाला फार त्रास देत आहे. म्हणून आम्ही सर्व जण आपणास शरण आलो आहोत.''

श्री विष्णूंनी देवतांना विचारले, ''हे देव-देवतांनो, रावणवधासाठी आपण सर्वांनी कोणता उपाय शोधला आहे?''

अशा प्रकारे त्यांनी विचारणा केल्यानंतर देवतांनी त्यांना उत्तर दिले, ''अंधारात संचार करणाऱ्या त्या राक्षसास पितामह ब्रह्मांनी वर दिला आहे की, मनुष्याव्यतिरिक्त त्याला कोणाहीपासून भय नाही.'' असा वर प्राप्त झाल्याने तो उन्मत्त झाला आहे. त्रिलोकास त्रास देऊन त्याशिवाय तो स्त्रियांना पळवून नेतो. हे विष्णुदेवा, कृपा करून मनुष्यरूप धारण करून रावणास युद्धभूमीवरच मारून टाकावे.''

त्यांनी अशा प्रकारे गयावया केल्यानंतर श्री विष्णू त्यांना म्हणाले, ''देवतांनो, तुम्ही मनातील भीती काढून टाका. तुमच्या रक्षणासाठी मी रावणास त्याचे पुत्र, बंधू-बांधव, अमात्य, मंत्री, त्याच्या गणगोतासह युद्धभूमीवर मारून टाकेन.''

श्रीविष्णूंनी अवतार धारण करताना दशरथ राजाच आपले पिता असावेत अशी इच्छा प्रकट केली. त्या वेळी राजा दशरथ पुत्रेष्टि यज्ञ करतच होते. ब्रह्माजींची संमती घेऊन ते अदृश्य झाले.

विष्णूजींच्या जाण्यानंतर ब्रह्माजी समस्त देवगणांस म्हणाले, ''देवांनो! तुम्ही पृथ्वीवर जाऊन वानर रूपात आपल्याइतकेच प्रबळ व पराक्रमी अशा वीर

पुत्रांना निर्माण करा, जे राजा दशरथाकडे पुत्ररूपात जन्म घेणार आहेत अशा विष्णूंना मदत करण्यास सक्षम असतील.''

देवांनी त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानून वानररूपात अनेक पुत्र निर्माण केले. अस्वल, वानर व लंगूर जातीतील हे वीर पराक्रमी होतेच, परंतु इच्छारूप धारण करणारे होते.

थोड्या अवधीनंतर दशरथाचा यज्ञ चालू असताना अग्निकुंडातून एक अवाढव्य पुरुष प्रकट झाला. त्याच्या हातामध्ये चांदीच्या झाकणाने झाकलेली एक सोन्याची परात होती. दशरथाकडे दृष्टी टाकून तो म्हणाला. ''मी प्रजापतींच्या आज्ञेनुसार इथे प्रकट झालो आहे.''

दशरथाने विनम्रपणे हात जोडले व त्याला म्हणाले, ''आपले स्वागत असो. सांगा, मी आपली काय सेवा करू?''

''हे नरेशा! पुत्रप्राप्तीसाठी देवतांनी स्वत: बनवलेली ही खीर आहे. आपल्या पत्नींना ही खीर देऊन ती खाण्यास सांग. त्यामुळे त्या गर्भवती होतील व तुला अनेक पुत्रांची प्राप्ती होईल.''

राजा ती खीर घेऊन आपल्या अंत:पुरात गेले. खिरीतील अर्धा भाग त्यांनी आपली राणी कौसल्यास दिला. राहिलेल्या खिरीच्या अर्ध्या भागातील अर्धा भाग सुमित्रास दिला. त्यातील राहिलेल्या खिरीतील पुन्हा दोन भाग करून एक कैकयीस व पुन्हा थोडा वाटा सुमित्रेस दिला. खीर खाल्ल्यानंतर यथावकाश तीनही राण्या गर्भवती झाल्या.

### पुत्रांचा जन्म व बारसे

यज्ञाची सांगता झाल्यावर देव-देवलोकांत परतले. विभिन्न देशांचे राजा, वसिष्ठ ऋषी तसेच ऋष्यशृंग, त्यांची पत्नी शांतासह प्रस्थान करते झाले. यज्ञसमाप्तीनंतर बाराव्या महिन्यात कौसल्याने एका पुत्रास जन्म दिला. त्यानंतर कैकयीने एका व सुमित्रेने दोन पुत्रांस जन्म दिला.

सगळ्यात मोठ्या म्हणजेच कौसल्येच्या पुत्राचे नाव राम, त्यापेक्षा छोट्या, कैकयीच्या पुत्राचे नाव भरत व सुमित्रेच्या दोन पुत्रांची नावे अनुक्रमे लक्ष्मण व शत्रुघ्न ठेवली गेली. ते सगळे जाणकार बालक सद्‌गुणांची जणू खाणच होते. ते सतत वेदाभ्यास, धनुर्वेदाभ्यास व वडिलांची सेवा यात दंग असत.

## विश्वामित्रांचे आगमन

एके दिवशी राजा दशरथ आपले पुरोहित व सर्व भाऊबंदांसह आपल्या पुत्रांच्या विवाहाविषयी चर्चा करत होते, त्याच वेळी सभेत महर्षी विश्वामित्रांचे आगमन झाले.

दशरथाने ब्राह्मणांसमवेत मोठ्या आनंदाने महर्षींचे स्वागत केले. ते विश्वामित्रांना म्हणाले, ''मुनिश्रेष्ठ, आपले स्वागत असो. तुम्ही इथपर्यंत येण्याचे कष्ट घेतलेत हे मी माझे मोठे भाग्यच समजतो. सांगा, मी आपली काय सेवा करू? आपल्या आज्ञेचे मी पुरेपूर पालन करेन.''

दशरथाच्या तोंडून असे उद्गार आल्यावर महर्षी विश्वामित्र खूप आनंदित झाले व म्हणाले, ''हे नृपति! मोठ्या कुळात तू जन्म घेतलास व वसिष्ठ ऋषींसारखा एक महान उपदेशक तुम्हाला मिळाला आहे. आता माझ्या मनातील एक गोष्ट ऐका. एका सिद्धीप्राप्तीसाठी मी एका नियमाचे अनुष्ठान मांडले आहे. या कार्याचे जवळपास बरेचसे काम पूर्ण होत आले आहे, परंतु आता सरतेशेवटी इच्छारूप धारण करणारे दोन राक्षस या कार्याच्या समाप्तीच्या वेळी कार्यात आम्ही विघ्न आणू अशी भीती दाखवत आहेत. माझ्या पवित्र यज्ञ-वेदीवर त्यांनी रक्त-मांसाचा सडा घातलाय. त्यांच्या या कृतीमुळे माझ्या अनुष्ठानात विघ्न आले व माझे सर्व प्रयत्न फुकट गेले, म्हणून मी तडक इकडे निघून आलो. मी केलेल्या अनुष्ठानाचा असा नियम आहे की, या कालावधीत मी कोणालाच शाप देऊ शकत नाही. म्हणूनच मी तुला सांगू इच्छितो की, तुझा पराक्रमी पुत्र राम मला दे. मला सुरक्षित ठेवून त्या दोन राक्षसांशी दोन हात करण्याचे सामर्थ्य त्याच्यात आहे. या काळात अनेक प्रकारच्या विद्येत मी त्याला पारंगत करेन की, ज्याच्यामुळे त्रिलोकात त्याचा जयजयकार होईल. मी तुला शब्द देतो की, त्या दोन राक्षसांचा रामाच्या हातूनच वध होईल. यज्ञाच्या राहिलेल्या या दहाच दिवसांसाठी रामास माझ्याबरोबर पाठवा. त्याचे माझ्याबरोबर येणे फार महत्त्वाचे आहे. तुम्ही असे काहीतरी करा की, ज्यामुळे माझा यज्ञाचा वेळ वाया जाऊ नये.''

विश्वामित्रांचे शब्द ऐकताच दशरथांचा थरकाप उडाला व ते बेशुद्ध पडले. थोड्याच वेळात ते सावध झाले व विश्वामित्रांना म्हणाले, ''हे महामुनी! राम अजुनी सोळा वर्षांचासुद्धा झाला नाही. मला असे वाटत नाही की, तो